

आजचा दिनविशेष
२०२४ : बांगलादेश प्रधानमंत्री शेख हसीना यांना देश सोडून पलायन करावे लागले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ५ ऑगस्ट २०२५ | अंक २२७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# कर्णानंतर दुसरे दानशूर म्हणजे एकनाथ शिंदे
# शरद पवारांच्या खास माणसाकडून तोंडभरुन कौतुक

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार उत्तम जानकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं कौतुक केलं आहे. कर्णानंतर दुसरा दानशूर माणूस म्हणजे एकनाथ शिंदे साहेब, असं जानकर यांनी म्हटलं आहे. ते माळशिरस येथील होलार समाजाच्या मेळाव्यात बोलत होते. उत्तम जानकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं कौतुक केलं आहे, कर्णानंतर दुसरा दानशूर माणूस म्हणजे एकनाथ शिंदे साहेब, राजकारणात एकनाथ शिंदे यांच्यासारखा माणूस मी कधीही पाहिला नाही. मी 30 वर्षांपासून राजकारणात वावरतो, दुसऱ्या पक्षात आहे, मात्र असा माणूस पाहिला नाही, असं यावेळी उत्तम जानकर यांनी म्हटलं आहे. ते पुढे बोलताना म्हणाले गरीब समाजाला न्याय मिळावा यासाठी हा मेळावा आहे, गावात घरकुलसाठी होलार समाजाला जागा मिळावी, माळशिरससाठी 100 मुलं आणि मुलींसाठी वसतिगृह मंजूर आहे, मात्र त्यासाठी जागा उपलब्ध व्हावी अशी




मागणी आहे. होलार समाजाच्या महामंडळासाठी 100 कोटीचा निधी मिळावा, अशी मागणी आहे, असं यावेळी उत्तम जानकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान या मेळाव्याला सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची देखील उपस्थिती होती.

## नेमकं काय म्हणाले संजय शिरसाट?

व्यवस्था नाही म्हणून मुलं शिकत नाही, मुलं शिकत नाहीत म्हणून प्रगती होतं नाही. माझं मत आहे, की तुम्ही रस्ता नका मागू त्यापेक्षा मुला मुलींना शिक्षण द्या. त्यासाठी निधी मागा मी देतो. होलार समाजाच्या महामंडळासाठी मी तातडीने 50 कोटींची तरतूद करतो. तुम्ही 100 कोटीची मागणी केली पण मी 50 कोटी मान्य केले, कारण मी जर 100 कोटी म्हणालो असतो आणि मी देऊ शकलो नाही तर बसलेले लोकं माझे विरोधक होतील, त्यामुळे जेवढे देऊ शकतो तेवढेच आश्वासन मी देतो, असंही यावेळी संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

# मराठा आरक्षणासाठी जरांगेंचा पुन्हा एल्गार; २९ ऑगस्टला आंदोलकासह मु ंबईत धडकणार

निफाड। प्रतिनिधी मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अन्तोपर्यंत मरणारही नाही. सरकारने माझ्या नादी लागू नये, नादी लागलात, तर बाजार उठवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देत आरक्षण असणाऱ्या किंवा नसणाऱ्या दोघांनीही २९ ऑगस्टला मु ंबईत धडक द्यावी, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले. प्रत्येक मराठ्याने एक दिवस मला आशीर्वाद देण्यासाठी मु ंबईला या, अशी भावनिक सादही त्यांनी घातली. निफाड तालुक्यातील खेडलेझु ंगे येथील १०८ फुटी महाबली हनुमान मूर्तीजवळ रविवारी (दि. ३) जरांगे पाटील यांचा नाशिक जिल्ह्यासाठी मेळावा पार पडला. मु ंबईतील आंदोलनापूर्वी मराठा बांधवांसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने या प्रचार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास निफाड, सिन्नर व येवला तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी उपस्थिती लावली होती. मात्र, मेळाव्यास महिलांची उपस्थिती नगण्य असल्याने जरांगे यांनी आयोजकांवर नाराजी व्यक्त केली. दरम्यान, विजय सदाफळ व धर्मराज घोटेकर यांनी जरांगे यांचा सत्कार केला. मराठा बांधवांना आवाहन करताना जरांगे म्हणाले, एक दिवस जातीसाठी द्या. गावागावातून मराठ्यांनी मु ंबईत या. प्रत्येकाने मोबाइलवरून ङ्गजातीसाठी मु ंबईला चलाफ असे आवाहन करून ही मोहीम यशस्वी करा. जो येणार नाही त्याला पाडायचा हे लक्षात ठेवा. आरक्षणामुळे नोकरीत बढती नाही, शिक्षणात अडचणी आहेत, त्यामुळे आरक्षण महत्त्वाचे आहे. आरक्षणाचे काम पूर्ण झाले की, मी शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणार आहे. यावेळी मराठा आरक्षणाचा विजयाचा गुलाल मला मराठा बांधवांवर फेकायचा आहे, असे ते म्हणाले. पुणे आणि नाशिक जिल्ह्याने मु ंबईला भाकरी पाठवा. आरक्षण दिल्याशिवाय मु ंबईतून माघारी नाही

# मनोज जरांगे पाटील यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली सदिच्छा भेट

बीड (प्रतिनिधी) दि.४ : मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीजवळील अंकुश नगर येथे सोमवारी (दि.४) सदिच्छा भेट घेतली. बीडमध्ये दोन दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांची एका कार्यक्रमात भेट झाली होती. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी सहकाऱ्यांसोबत निवांत सदिच्छा भेट घेतली. यावेळी सामाजिक, राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली. संवाद साधत असताना त्यांचा सकारात्मक मिळालेला प्रतिसाद हा पुढील वाटचालीसाठी नवऊर्जा देणारा आहे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले. याप्रसंगी संपादक गंगाधर काळकुटे, सरपंच अमोल बागलाने, देविदास जाधव हे उपस्थित होते.



# ताडसोन्ना या ठिकाणी विठ्ठल बिरदेव यात्रा परस कार्यक्रम संपन्न

## येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषणाने गाव दुमदुमले



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी बीड तालुक्यातील ताडसोन्ना या गावी विठ्ठल बिरदेव यात्रा परस कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले, यावेळी गावातून भव्यदिव्य ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली, पोटावर तलवार मारून घेण्याची परंपरा कायम अबाधित ठेवली, यावेळी येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषणेने गाव दुमदुमले, हा कार्यक्रम पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती,

# श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये टाळ मृदंगाच्या गजरात बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याला सुरुवात..!

बीड प्रतिनिधी - विसाव्या शतकातील महानसंत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपा आशीर्वादाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याला सुरुवात झाली आहे. श्री ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान यांच्या हस्ते कलश पूजन व दीप प्रज्वलन करून सप्ताह सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार




श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये बाळनाथ महाराजांचा पालखी सोहळा आयोजित केला जातो. याही वर्षी बाळनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याला टाळ मृदंगाच्या गजरामध्ये सुरुवात करण्यात आली. या पालखी सोहळ्यामध्ये आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांचे हरीकीर्तन होणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये पहाटे 4 ते 6 काकडा भजन, सकाळी 7 ते 10 ज्ञानेश्वरी पारायण, 10 ते 12 गाथा भजन, 4 ते 5 ज्ञानेश्वरी प्रवचन, 5 ते 6 हरिपाठ, रात्री 8 ते 10 या वेळेमध्ये हरिकीर्तन, तसेच रात्री 10 ते 3 या वेळेमध्ये संगीत भजन व जागराचे कार्यक्रम होणार आहेत. सर्व कार्यक्रम हे श्री ह भ प महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहाची व बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याची समाप्ती ही बाळनाथ महाराजांच्या पालखी मिरवणुकीने आणि काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. 11 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी नऊ वाजता बाळनाथ महाराज यांच्या पालखी मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. बाळनाथ महाराजांची पालखी ज्यावेळेस मंदिरामध्ये दाखल होईल त्यानंतर तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडी यांचे काल्याचे किर्तन होऊन सप्ताहाची समाप्ती होणार आहे.

# मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानांना दोन कोटींचा भुर्दंड, काहींची मुजोरी सुरूच

दुकानांवर मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानांवर महापालिकेकडून कारवाईचा बडगा सुरूच आहे. महापालिकेने 3 हजार 133 दुकाने, आस्थापनांवर कारवाई करत आतापर्यंत तब्बल 1 कोटी 98 लाखांचा दंड वसूल केला आहे. शिवाय नियम मोडणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाई तसेच न्यायालयीन प्रक्रियेलाही सामोरे जावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर दुकाने व आस्थापनांवर मराठी पाट्या लावणे बंधनकारक केले आहे. मुंबईत नऊ लाखांहून अधिक दुकाने व आस्थापना आहेत.महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तींचे विनियमन) नियम, 2018 व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तींचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, 2022च्या अनुक्रमे नियम 35 व कलम 36 क च्या तरतुदींनुसार आस्थापनांचे फलक मराठी देवनागरी लिपीत व ठळक अक्षरात असणे बंधनकारक आहे. मध्यंतरी पालिकेची कारवाई थंडावली होती. मात्र, हिंदी सक्तीच्या निर्णयावरून मुंबईत तापल्यानंतर कारवाईने पुन्हा जोर धरल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत पालिकेकडून या मोहिमेत 1 लाख 27 हजार भेटी दिल्या असून अनेक जण कोर्टातही गेले आहेत. संबंधित दुकानदारांना उच्च न्यायालयात हजेरी लावावी लागेल आणि न्यायालय दंडाची रक्कम ठरवेल, अशी माहिती महापालिकेने दिली.

# कराडच्या मुलाचे धक्कादायक दावे, आता ज्ञानेश्वरी मुंडेंनी सगळं समोर आणलं

महादेव मुंडे हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप बाळा बांगर यांनी केला होता. तसेच वाल्मिक कराडची मुलंही या हत्येत सहभागी होते असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला होता. मात्र वाल्मिक कराडचा मुलगा सुशील कराडने हे सर्व आरोप फेटाळले होते. आम्ही महादेव मुंडेंना ओळखत नव्हतो असं सुशील कराडने म्हटलं होतं. त्यानंतर आता महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडेंनी दिलेल्या उत्तरामुळे या प्रकरणाला नवीन वळण मिळाले आहे. सुशील कराड काय म्हणाले होते? सुशील कराड यांनी म्हटले होते की, 'महादेव मुंडे हत्या प्रकरणात होत असलेले आरोप खोटे आहेत. महादेव मुंडेंना आम्ही



कधीही ओळखत नव्हतो. ना मी त्यांना कधी पाहिलं होतं, ना माझ्या भावाने त्यांना कधी पाहिलं होतं, ना माझ्या वडिलांनी त्यांना कधी पाहिलं होतं.' हे सुद्धा वाचा मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानांना दोन कोटींचा भुर्दंड, काहींची मुजोरी सुरूच... पृथ्वीला एलियन्स पासून धोका, हॉकिंग यांची 'ती' भविष्यवाणी खरी ठरणार; डिसेंबरमध्ये... 'या' कारणामुळे समुद्रातून तेल काढणे जमिनीपेक्षा खूप महाग आहे, वाचा सविस्तर! पोलिसांना फोन का केला? यावर बोलताना ज्ञानेश्वरी मुंडेंनी म्हटले की, 'तुम्ही जर महादेव मुंडे ला ओळखत नव्हता तर पोलिसांना का कॉल केले. मी पहिल्यापासून सानप यांच्या सीडीआरची मागणी करत आहे. तसच भास्कर केंद्रे या यांचेही सीडीआर काढण्यात यावे ही माझी मागणी आहे. ठाकूर यांच्यासहित डीवायएसपी कविता नेहरकर यांचाही सीडीआर काढण्यात यावा. डीवायएसपी चोरमले पीआय यांच्यासमोर मला गोविंद यलमाटे म्हणाले की, 'मला बंगल्याहून फोन आला तपास थांबवा. ओळख नव्हती तर मग तपास थांबविला.' असा सवाल ज्ञानेश्वरी मुंडेंनी सुशील कराडला विचारला आहे. पुढे बोलताना ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, मी माझ्या मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती, त्यांनी काय करावं ते त्यांनी ठरवावे. सुप्रिया ताईंनी देशासमोर मागणी केली आहे की या प्रकरणात सीबीआय मार्फत चौकशी झाली पाहिजे. जेव्हा मी आणि माझा भाऊ हॉस्पिटलमध्ये होतो, तेव्हा माझ्या वडिलांकडे एक व्यक्ती आला त्यांनी सांगितलं, ताईच्या नावाने मी फ्लॅट करतो मीडिया ट्रायल बंद करा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ५ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

# स्वदेशी वस्तूंचा आग्रह

महात्मा गांधींनी देशवासीयांना स्वदेशी वस्तू वापरण्याचा आणि खेड्याकडे चलण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचीच री ओढली आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना आपले आर्थिक हित जोपासण्याचे आवाहन केले आहे. आपले शेतकरी, लघु उद्योजक, तरुणांचा रोजगार आणि या सर्वांचे हित सरकारसाठी सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे नागरिकांनी भारतीयांच्या काबाडकष्टातून तयार झालेल्या वस्तूच खरेदी कराव्यात असे आवाहन पंतप्रधानांनी केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था ङ्गमृतफ असल्याचे म्हटले होते. भारत रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याबद्दल ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर आणि दंडाची घोषणा केली आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी वाराणसी येथे बोलताना देशवासीयांनी नवीन वस्तू घेताना स्वदेशी मालाला पसंती द्यावी असे आवाहन केले. डोनाल्ड ट्रम्प यांना अप्रत्यक्ष प्रत्युत्तर देताना पंतप्रधान म्हणाले, भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. भारताने आपल्या आर्थिक हितसंबंधांबाबत जागरूक राहायला हवे, तसेच स्वदेशी उत्पादनांवर भर देत पुढे गेले पाहिजे. ज्या वस्तू तयार करण्यासाठी आपल्या देशवासीयांनी घाम गाळला आहे, अशा वस्तू स्वदेशी आहेत. आपण ङ्गमेक इन इंडियाफ वस्तूच खरेदी केल्या पाहिजेत. आपले सरकार देशाच्या विकासासाठी जे काही शक्य आहे ते करत आहे. ज्यांना देशाचा विकास करायचा आहे, भारताला जगातील सर्वांत मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून पहायचे आहे, त्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून स्वदेशी वस्तू साठी आग्रही राहिले पाहिजे. यासाठी कोणताही राजकीय पक्ष, राजकीय नेता असो त्यांनी मतभेद बाजूला ठेवून स्वदेशीचा संकल्प केला पाहिजे असेही पंतप्रधान म्हणाले. जागतिक पातळीवर अस्थिरतेचे वातावरण आहे. सारे देश त्यांच्या वैयक्तिक हितसंबंधावर लक्ष देत आहेत. त्यामुळे भारतालाही आपल्या आर्थिक हितसंबंधाबाबत अधिक सतर्क राहावे लागेल. जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना व्यापा–यांनी केवळ स्थानिक वस्तूंची विक्री करण्याची शपथ घ्यावी. ग्राहकांनी खरेदी करताना ते देशातच उत्पादित झाले आहे काय, याचा जरूर विचार करावा असे सांगत पंतप्रधानांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापरावर भर दिला. देश स्वतंत्र झाला तेव्हा भारतीयांची ङ्गमेड इन इंग्लंडफ, ङ्गमेड इन जापानफ, ङ्गमेड इन यूएसएफ वस्तूंना पसंती असायची. कारण या वस्तू टिकाऊ, मजबूत आणि त्यांचा दर्जा उत्तम असायचा. त्यानंतर हळूहळू प्रत्येक क्षेत्रात भारताने प्रगती साधण्यास सुरुवात केली आणि भारतीय वस्तूही जागतिक दर्जाच्या बनू लागल्या हा इतिहास आहे. ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला मृत अर्थव्यवस्थाफ असे संबोधले होते. तसेच भारतीय मालावर २५ टक्के टॅरिफ लावल्याची घोषणा करून रशियन युद्धसामग्री व तेल वापरल्यास दंडाची घोषणा केली होती. त्यावर पंतप्रधानांनी पहिल्यांदाच भाष्य केले. वाराणसी मतदारसंघात पंतप्रधानांनी २ हजार कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन, उद्घाटन केले. या मतदारसंघातील बनौली गावात बोलताना पंतप्रधान म्हणाले, आम्ही लखपती दीदी मोहीम राबवत आहोत. आमचे लक्ष्य तीन कोटी लखपती दीदी बनवण्याचे आहे. हा आकडा ऐकून सपावाले सायकल घेऊन पळून जातील. आतापर्यंत आम्ही दीड कोटी महिलांना लखपती दीदी बनवले आहे. सरकारने महिलांसाठी मोठे काम केले आहे. अमेरिकेच्या दबावामुळे भारताने रशियाकडून तेलखरेदी बंद केल्याचा दावा केला जात होता परंतु ङ्गएएनआयफच्या वृत्तानुसार भारताने रशियाच्या तेल रिफायनरीकडून खरेदी सुरूच ठेवली आहे. ट्रम्पसाठी हा निर्णय धक्कादायक मानला जात आहे. खरे पाहता जागतिक व्यापाराचा निर्णय हा किंमत, कच्च्या तेलाची गुणवत्ता, साठवण आणि इतर आर्थिक घटकांवर आधारित घेतला जातो. रशिया जगातील दुसरा मोठा कच्च्या तेलाचा उत्पादक देश आहे. रशिया दिवसाला ९.५ मिलियन बॅरल तेलाचे उत्पादन करतो. तसेच तो जगातील दुसरा सर्वाधिक तेल निर्यात करणारा देश आहे.

# जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयातील कर्मचाऱ्यांचा आक्रोश

## आर्थिक छळ आणि मानसिक त्रासामुळे शिक्षकांचे 11 ऑगस्टपासून आमरण उपोषण



प्रजा-शासन प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि ४ उरण तालुक्यातील प्रसिद्ध जवाहरलाल नेहरू पोर्ट (शेवा ) विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आता सहनशीलतेच्या पलीकडे पोहोचले आहेत. गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक छळ आणि मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी येत्या ११ ऑगस्ट, २०२५ पासून आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला आहे. नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तमजी केरावाला फाउंडेशन ( विग्बोर ) संस्थेने चालवलेला अन्याय आता चव्हाट्यावर आला आहे. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार रुस्तमजी केरावाला फाउंडेशनने सातवा वेतन आयोग तर लागू केला नाहीच, पण त्यासोबतच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ता जुलै २०१९ पासून दिलेला नाही. गेल्या सात वर्षांपासून ही थकीत रक्कम मिळालेली नाही. यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची आर्थिक कुचंबणा झाली आहे आणि त्यांची मानसिकता ढासळली आहे. वारंवार शालेय समितीमध्ये विषय काढूनही संस्थेच्या प्रशासनाने याकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली आहे.त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

### केवळ कागदावरच हस्तांतरण, प्रश्न प्रलंबितच.

शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन जवळजवळ तीन वर्षांचा काळ लोटला आहे, तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिलेल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार पत्रव्यवहार करूनही आमच्या पत्रव्यवहाराची योग्य प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही, असे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. यामुळे गेली सहा वर्षे केलेल्या पाठपुराव्यानंतरही सर्व प्रश्न प्रलंबितच राहिले आहेत. या अन्यायामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

### अंतिम निर्णय, प्रशासनाला इशारा

आता कर्मचाऱ्यांनी अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. जोपर्यंत सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत ते जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा, येथील माध्यमिक इमारतीच्या गेटसमोर शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करतील. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, जर ११ ऑगस्ट, २०२५ पूर्वी थकीत रक्कम मिळाली नाही आणि या उपोषणादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल.

### मागण्यांची पूर्तता होईपर्यंत लढा सुरूच

या निवेदनाची एक प्रत आमदार महेशजी बालदी, आमदार प्रशांतजी ठाकूर आणि माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्यासह अनेक राजकीय नेते, पालक संघटना, शिक्षक संघटना, समाजसेवक, कामगार नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे, जेणेकरून या गंभीर समस्येवर तातडीने लक्ष दिले जावे. कर्मचाऱ्यांनी आता आपली सर्व आशा सोडून न्यायासाठी थेट आंदोलनाचा मार्ग अवलंबला असून, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे दिसते.

# गोरक्षनाथ टेकडी परिस आहे, सेवा करुन जीवनाच सोन करा:- ह.भ.प.सांगळे महाराज

बीड (प्रतिनिधी) गोरक्षनाथ टेकडी हि गुरू शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे गोरक्षनाथांनी गुरू मच्छिंद्रनाथांची सेवा केली तशी गुरू किसन बाबा महाराज यांची सेवा सद्गुरू गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केली. गुरू शिष्य सेवेतून गोरक्षनाथ टेकडी हि पुनीत झाली आहे. गोरक्षनाथ टेकडी हि परिस आहे येथे तुमच्या आयुष्याच सोन करायचं असेल तर तुम्ही गोरक्षनाथ टेकडी सेवा करा गुरू किसन बाबा महाराज, गुरू नवनाथ बाबा महाराज यांची सेवा करा नक्कीच तुमच्या जीवनच सोन झाल्याशिवाय राहणार नाही असे अभंग विवेचन करताना ह. भ. प. संत ज्ञानेश्वर महाराज सांगळे मुंबई यांनी विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन पुष्प समर्पित करताना व्यक्त केले. या कीर्तनात मृदुंगसाथ ह.भ.प.अरुण महाराज कदम व ह.भ.प.ऋषिकेश महाराज जाधव कीर्तनात कीर्तन साथ ह.भ.प.सुग्रीव महाराज डाके,ह.भ.प. भागवत महाराज नरवडे व ह.भ.प.भीमराज महाराज घुगे नाशिक यांनी दिली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सद्गुरू



संत किसन बाबा महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, संगीत भजन, हरिजागर, भारुड असे भक्तिमय कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे दोन दिवसापासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत

# लिंगभेदाच्या विरोधात संपुर्ण महाराष्ट्राची एकजूट; मेल नर्सेस बचाव समिती महाराष्ट्र राज्याचे एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन मुंबईत.

(प्रतिनिधी मुंबई) शासकीय DMER आधिपरिचारिका पदभरती मध्ये महिला आरक्षण 80 % आणि पुरुष आरक्षण फक्त 20% DHS डिस्ट्रिक हेल्थ सर्व्हिस मध्ये महिला आरक्षण 90% आणि पुरुष आरक्षण फक्त 10% कंत्राटी पदभरती कायमची थांबवावी, सर्व आरोग्य सेवा परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात,खाजगी हॉस्पिटल मध्ये शासकीय नियमानुसार वेतन व इतर सोयी सुविधा उपलब्ध नसणे , नर्सिंग क्षेत्राचे स्वतंत्र महामंडळ नसणे, शासनाच्या विविध आरोग्य मार्गदर्शक समित्यांवर लाभ, पद नसणे नर्सिंग ऑफिसर्स यांना शासन दरबारी योग्य तो मान,सन्मान नसणे अश्या विविध मागण्या तसेच शासनाच्या लिंगभेदी नियमानुसार( पुरुष )मेल नर्सेसवर होणारा अन्याय रद्द करा या मुख्य मागणी साठी 5 ऑगस्ट रोजी मुंबईत तीव्र एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेले “मेल नर्सेस बचाव समिती महाराष्ट्र राज्य” यांचे जनआंदोलन लोकशाही ,संविधानिक, कायदेशीर मार्गाने चालू आहे तरी शासनाने कसलीच दखल घेतली नाही, दाद दिली नाही त्यामुळे राज्यभरातील सर्व मेल नर्सेस यांची भविष्यात होणारी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, शासकीय नौकरी, प्रगती , विकास यांची मोठी पिछेहाट होणार असून परिचर्या संवर्गातून कायमचे हद्दपार होण्याची चिन्हे, लक्षणे दिसत आहेत याची जाणीव ठेवून च मेल नर्सेस बचाव समिती महाराष्ट्र राज्य मेल नर्सेस ची तीव्र भावना, होणारा अन्याय लक्षात घेता उद्या दि.5 ऑगस्ट रोजी आझाद मैदान ,मुंबई येथे तीव्र स्वरूपाचे एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन होणार आहे तरी महाराष्ट्रातील सर्व नर्सिंग संस्थाचालक ,नर्सिंग प्राचार्य ,नर्सिंग ट्यूटर , नर्सिंग विद्यार्थी, पालक आणि सर्व नर्सिंग ऑफिसर्स व सर्व नर्सिंग संबंधित घटक, हितचिंतक यांनी लाखोंच्या संख्येने उद्या होणाऱ्या आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे मेल नर्सेस बचाव समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात येत आहे अशी माहिती समिती चे राज्य समन्वयक अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.

# पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूल जप्त, एका आरोपीला अटक

जिल्ह्यातील पिंपळनेर पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्याला अटक केली आहे. किशोर रामभाऊ माटे (वय 37, रा. लोणी, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दि.04.08.2025 रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पिंपळनेर ते लोणी फाटा रस्त्यावर ओमकार हॉटेलसमोर एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सपोनि घुगे यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण पो शी पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांच्यासोबत दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली. हॉटेल ओमकारसमोर संशयित व्यक्ती उभा असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला पाठीमागील बाजूस एक अर्धवट गंजलेले लोखंडी गावठी पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. जप्त केलेल्या गावठी पिस्तूलाचे अंदाजित मूल्य 40,000/- रुपये आहे. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करून पिस्तूल जप्त केले आहे. आरोपीने बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल बाळगून लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम 3, 25 सह भारतीय न्याय संहिता, 2023 कलम 223 आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण, पो शि पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांनी केली आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ५ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## सौ.जयश्री जोशी यांना सांस्कृतिक आणि साहित्य रत्न पुरस्कार प्रदान झाला आणि कार्यक्रम उत्तम संपन्न झाला .

मुंबई प्रतिनिधी.. मुंबई जोगेश्वरी पूर्व येते अस्मिता शाळा मध्ये २७ जुलै २०२५ ल होता. “सा. आम्ही मुंबईकर “या साप्ताहिकामधे आठवड्यातुन दोन वेळा आम्ही सर्व सभासद साहित्य (काव्यलेखन) देतो, आणि वाचक रसिक भरभरुन दाद देतात म्हणुन भरुन पावतो. आमच्या प्रतिभेला वॉव मिळतो. माननिय श्री प्रमोद सुर्यवंशी सर यांच्या अथक प्रयत्नामुळे नवोदित लेखक, कवी यांना प्रेरणा, प्रोत्साहन मिळाले , हा “साहित्य रत्न “पुरस्कार केवळ त्यांच्यामुळेच मला मिळाला. निवड पत्र आल्यावर खूपच आनंद झाला, जोगेश्वरी येथे, अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक व अभिनेते मा. श्री अजय



बिरारी व उध्दघाटक जेष्ठ संपादिका सौ. वसुधा नाईक ,स्वागत अध्यक्षा सौ. विनिता कदम यांचे फारच आभार मानते. प्रमुख पाहुणे श्री सागर पतंगे देशमुख सर, (फिल्म ind) श्रीराम घडे पाठ्यपुस्तकातील कवी लघुपट अभिनेते उपस्थित होते. सूत्र संचालन श्रीशैल सुतार आणि सुचित्रा कुंचमवार यांनी सांभाळू उत्तम कार्यक्रम गाजवला आयोजन गौरव पुंडे योगेश हरणे रेखा चंद्रकात हरियाण महेश सोनवणे होते. सर्वांच्या प्रयत्नांनी कार्यक्रम सोहळा पार पडला. सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार २०२५ हा पुरस्कार मला मिळाला. संपूर्ण कार्यकारिणी चे आभार मानते. धन्यवाद,

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाई कदम यांचा 84 वा वाढदिवस जोशात



गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधीजोगेश्वरी पूर्व हनुमान नगर येथील रहिवाशी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिवसेना उबाठा गटाचे माजी शाखाप्रमुख भाई कदम यांचा वाढदिवस आरे वॉकर्स ज्येष्ठ नागरिक ग्रुप च्या वतीने ३ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी भाईंना ८४ व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देत शतायुषी व्हा अशी प्रार्थना केली.यावेळी इडली वडा डाळ वडा केक चहा असा पाहुणचार भाईंनी केला.विविध विषयांवर सकारात्मक चर्चा, वृक्षारोपण आणि विविध सामाजिक उपक्रम या ज्येष्ठ नागरिकांतर्फे नियमित आयोजित केले जात असतात.तसेच ही सर्व मंडळी दररोज सकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत आरे न्युझीलंड हॉस्टेल या ठिकाणी एकत्र जमतात.





श्री क्षेत्र, नारायणगड येथे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्या समवेत भेट दिली असता. यावेळी गडाचे महंत मठादिपती श्री. शिवाजी महाराज यांच्या समवेत बाजीराव (दादा) चव्हाण यांनी गडावरील विविध विषयावर चर्चा केली. तसेच तेथील कामाची देखील पाहणी केली. यावेळी उपस्थित युवासेना पदाधिकारी तसेच धर्मवीर प्रतिष्ठान, व बाजीराव (दादा) चव्हाण युवा मंच चे सर्व सहकारी उपस्थित होते.

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (AHTU) पुणे शहरातून केली पीडितेची सुटका व आरोपीला घेतले ताब्यात

## PSI पल्लवी जाधव व त्यांच्या AHTU टीमने केली कार्यवाही

पोस्टे शिरूर कासार गुन्हा रजिस्टर नंबर ७१/२०२१ कलम ३६३, ३७० भादवी हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. पीएसआय पल्लवी जाधव यांनी AHTU चा चार्ज घेतल्यावर सदर गुन्ह्याच्या मूळ फाईलचे, बारकाईने अवलोकन केले . त्यानंतर पीडित मुलीच्या मामा कडून गुन्ह्या संबंधाने माहिती मिळवली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. त्यावरून दिनांक ०२/०८/२०२५ रोजी सकाळी AHTU



ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने पुणे साठी रवाना झाली. पुणे शहरात दोन दिवस टीम आरोपीचा शोध घेत होती, आरोपीचे लोकेशन सारखे बदलत होते. शेवटी दोन दिवसाच्या अथक प्रयत्न नंतर YMK सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अव्हाळवाडी रोड , वाघोली येथे आरोपी मिळून आला. त्याला ताब्यात घेवून पीडितेबाबत चौकशी केली असता , त्याने पीडिता ही गणेश नगर, अव्हाळवाडी रोड, वाघोली ता. हवेली जि. पुणे येथे असल्याचे सांगितले . त्यावरुन तेथे जावून तिला ताब्यात घेतले. नंतर दोघांना सोबत घेवून सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी पोस्टे शिरूर कासार येथे हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली PSI पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

# आमची ५१ टक्के मतांची तयारी झालीय, ठाकरेंच्या युतीवर भाजपचे प्रत्युत्तर

मुंबई। प्रतिनिधी राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध सर्वच राजकीय पक्षांना लागले असून रणनीती आखण्यासही सुरुवात झाली आहे. मुंबई महापालिका काहीही करुन आपल्या ताब्यात घेण्यासाठी भाजपने तयारी सुरू केली असली तर, ठाकरेंच्या ताब्यातून बीएमसी जाऊ न देण्याचा प्रयत्न शिवसेना ठाकरे गटाचा आहे. त्यामुळेच, मुंबईत शिवसेना आणि मनसे एकत्र येण्याच्या हालचालींनी वेग घेतला आहे. त्यातच, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज मुंबईत पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेत आगामी निवडणुकांसाठी तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, शिवसेना-मनसे कार्यकर्त्यांना हेवेदावे विसरुन वाद न करण्याचा सल्लाही त्यांनी दिलाय. आता, राज ठाकरेंच्या भाषणानंतर भाजपने प्रतिक्रिया देत आम्ही ५१ टक्के मतदानाची तयारी केल्याचं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. भाजप महायुतीने ५१ टक्के मतदानाची तयारी केली आहे. विधानसभेत सुद्धा आम्हाला ५१.७८ टक्के मतं मिळाली आहेत. राज ठाकरे आणि त्यांच्या मित्र पक्षांनी काय तयारी केली ती मला माहिती नाही. पण, आमची तयारी झाली आहे. कोणीही आलं आणि लढलं तरीही ५१% मत महायुती घेणार आहे, असा प्रबळ विश्वासच भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलून दाखवला. यावेळी, एकही जागा काँग्रेस किंवा शरद पवार आणि ठाकरे यांच्या पक्षाला मिळणार नाही. कारण जनतेने स्वीकारला आहे की, नरेंद्र मोदी हे देशाला समृद्ध करत आहेत. तर देवेंद्र फडणवीस ते महाराष्ट्राला विकसित करत आहेत. त्यामुळे, जनता विकासासोबत जाणार आहे, असा विश्वास बावनकुळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत व्यक्त केला आहे. ठाकरे बंधु च्या युतीसंदर्भातील प्रश्नावरही चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर दिलं. ज्यांची निवडणूक लढविण्याची तयारी नाही, ते लोक असे विधान करतात. आम्ही उद्या निवडणुका लागल्या तरीही तयार आहोत. महाराष्ट्रात १ कोटी ५१ लाख सदस्य असणारा भाजप, अजित पवार आणि एकनाथ शिंदे तयार आहेत. ते काय करणार हे माहित नाही, मात्र आमची तयारी पक्की आहे असेही बावनकुळे यांनी म्हटलं.

## राज्यभरातील २२ हजार ग्रामपंचायत अधिकारी यांनी काळ्या फिती लाऊन कामकाज करून मा.राज्यमंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर यांचा निषेध नोंदवला

बीड - दि.2 ऑगस्ट 2025 रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळातील जबाबदार राज्यमंत्री मा.ना.मेघनाताई बोर्डीकर तथा मा.पालकमंत्री परभणी यांनी जिंतूर तालुक्यातील बोरी गाव येथील प्रशासनाने आयोजीत केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांनाना घरकुल मंजुरीचे प्रमाणपत्र वाटपाच्या कार्यक्रमात ग्रामपंचायत बोरी चे ग्रामपंचायत अधिकारी श्री विनायक पुंड यांनी प्रामाणिक पणे जबाबदारी पार पाडली असताना सुद्धा सार्वजनिक कार्यक्रमामध्ये अपमानास्पद वागणूक देऊन असभ्य भाषा वापरून मारहाणीची चितावणीखोर भाषा वापरली आसल्याने परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांचे मनोबल खचले असून संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या मध्ये संतापाची लाट उसळली आहे त्यामुळे सदरील घटनेचा निषेध म्हणून मा.राज्याध्यक्ष श्री संजिव निकम साहेब महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डीएनई 136 यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील संपूर्ण 22 हजार ग्रामपंचायत अधिकारी सोमवार दिनांक 4 ऑगस्ट 2025 रोजी संपुर्ण महाराष्ट्र भर सन्माननीय मंत्री महोदयांच्या वक्तव्याचा एक दिवसभर काळ्या फिती लावून कामकाज करून जाहीर निषेध करण्यात आला आहे. यामध्ये बीड जिल्हयातील 100 टक्के ग्रामपंचायत अधिकारी यांनी काळया फिती लाऊन एकदिवस कामकाज केले. तसेच मंत्री महोदयाच्या अशा चुकीच्या कृत्या बद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डीएनई 136 च्या वतीने दि.7/8/2025 रोजी सकाळी 11 ते 12 या वेळेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे.परंतु सदरील दिवशी बीड जिल्ह्यामध्ये प्रशासनाच्या वतीने पुर्व नियोजीत वृक्षलागवड कार्यक्रम आसल्याने बीड जिल्हया मध्ये दि. 8/8/2025 रोजी सकाळी 11 वा. ते दुपारी 1 वाजता पर्यंत बीड जिल्हा परिषद पासुन मोर्चा ची सुरुवात होऊन मोर्चाचा समारोप बीड जिल्हाधिकारी कार्यालया समोर करण्याचे आयोजन बीड जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियन कडुन करण्यात आले आहे. सदरील युनियन पदाधिकारी यांनी या मुक मोर्चा बाबतचे रितसर निवेदन जिल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद बीड व पोलीस अधिक्षक बीड यांना देऊन कळवले आहे.

## माऊली माध्यमिक विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त संदर हस्ताक्षर स्पर्धा संपन्न

बीड-प्रतिनिधी माऊली माध्यमिक विद्यालय एमआयडीसी बीड येथे लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यानिमित्ताने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माऊली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष नवनाथराव थोटे तर अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मधुकर काळे सर होते. यावेळी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्रतिमापूजननंतर आरुष मकासरे, हरिओम सानप आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर अध्यक्षीय भाषणात नवनाथराव थोटे बापु यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची ओळख करून दिली. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून गरीब,शेतकरी,दलित,कष्टकरी यांच्या व्यथा मांडली. लोकमान्य टिळक यांच्या विषयी, तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान याबद्दल सखोल माहिती करून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.मुख्याध्यापक काळे सरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावरील अनेक कथा,गोष्टी ,व प्रसंग सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोडकर सर यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी व बालसदनचे अधीक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने शाळेत सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या त्यानंतर खाऊचे वाटप करण्यात आले

# राशीन येथील महात्मा फुले चौकाच्या फलकाची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कारवाई करून अटक करावी-ॲड.राऊत

बीड। प्रतिनिधी कर्जत तालुक्यातील राशीन येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाच्या फलकाची तोडफोड करून विटंबना करणाऱ्या जातीयवादी समाजकंटकांना तात्काळ अटक करावी अशी मागणी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांनी केली आहे. बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन सादर करण्यात आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असलेल्या राशीन येथील चौकाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचे नामकरण सन २०१४ मध्ये ग्रामसभेच्या ठरावाने देण्यात आले होते. महात्मा फुले



यांना मानणाऱ्या समाज बांधवांनी या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचा फलक उभारला होता. परंतु दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी काही समाजकंटकांनी या फलकाची तोडफोड करून विटंबना केली आहे. या समाजकंटकांवर तात्काळ कार्यवाही करून अटक करण्यात यावी अन्यथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ड. संदीप बेदरे, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष सावता काळे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, नाभिक समाजाचे युवा नेते अजिंक्य सुरवसे, वडार समाजाचे शरद विटकर, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, महेश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य अजय राऊत यांच्यासह समता सैनिक व महात्मा फुले प्रेमी नागरिक उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ५ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# सगळ्या नेत्यांना स्थान, पण धनंजय मुंडेंचा फोटो गायब, बीडमधील त्या बॅनरची राज्यभरात चर्चा!

गेल्या काही दिवसांपासून माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत आहेत. मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे असलेले कृषीखाते मिळावे यासाठी मुंडे यांनी नुकतेच प्रयत्न केले होते. पण कृषिमंत्रिपदाची माळ दत्ता भरणे यांच्या गळ्यात पडली आणि क्रीडा खाते कोकाटे यांना देण्यात आले. मुंडे यांच्या कार्यकाळात कृषीखात्यात आर्थिक गैरव्यवहार झाला होता, असाही आरोप करण्यात आला. त्यातून मात्र ते निर्दोष सुटले. या सर्व घडामोडींमुळे बीड जिल्हा राज्यात चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. असे असतानाच आता बॅनरमुळे बीडचं राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे. धनंजय मुंडे यांच्या जिल्ह्यातील बॅनरवर त्यांचाच फोटो गायब असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या बॅनरवर अजित पवार यांचा फोटो आहे. त्यामुळेच इथे वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. ठिकठिकाणी लावण्यात आले बॅनर्स बीडमध्ये राष्ट्रवादी प्रवेशाच्या बॅनरवर धनंजय मुंडे यांचा फोटो नसल्याचे समोर आले आहे. भाजपाचे राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडे यांचा 7 ऑगस्ट रोजी बीडच्या वडवनी येथे राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षात जाहीर प्रवेश होणार आहे. या कार्यक्रमाला अजित




पवार हेदेखील उपस्थित राहणार आहेत. आमदार प्रकाश सोळंके यांच्या स्थानिक नेतृत्त्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे. या पक्षप्रवेश सोहळ्याची जास्तीत जास्त लोकांना माहिती मिळावी यासाठी बीडमध्ये जागोजागी बॅनर्स लावण्यात आले आहेत. याच बॅनर्सवर धनंजय मुंडे यांचा फोटो नसल्याचे समोर आले आहे. बॅनरवर नेमके काय आहे? सध्या समोर आलेल्या काही बॅनर्सवर बाबरी मुंडे यांचे नाव दिसत आहे. सोबतच अजित पवार यांचेही नाव आहे. या बॅनरवर प्रकाश सोळंके, अजित पवार यांचेही मोठे-मोठे फोटो आहेत. विशेष म्हणजे राष्ट्रवादी पक्षातील अन्य वरिष्ठ नेत्यांचेही वर फोटो लावलेले दिसत आहेत. यात प्रफुल्ल पटेल, सुनिल तटकरे, रुपाली चाकणकर यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांचा समावेश आहे. मात्र या बॅनरवर धनंजय मुंडे यांचा फोटो मात्र कुठेही नाही. गेल्या काही दिवसांत मुंडेंसोबत नेमकं काय घडलं? ही बाब बीडच्या लोकांच्या नजरेतून सुटलेली नाही. हे बॅनर समोर आल्यानंतर बीडच्या राजकारणात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यात आले. या आरोपांमुळे त्यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. मध्यंतरी त्यांची प्रकृतीही बिघडली होती. त्यानंतर काही दिवस ते सार्वजनिक कार्यक्रमांत दिसले नव्हते. या सर्व घडामोडींनंतर आता धनंजय मुंडे यांचा बॅनरवर फोटो दिसत नाहीये. याचा नेमका काय अर्थ काढावा? असा सवाल बीडमध्ये केला जात आहे.

## आनेगावच्या जिल्हा परिषद शाळेने गुणवंत विद्यार्थी घडवून आदर्श निर्माण केला-दत्तात्रय मुजमुले

केज । प्रतिनिधी शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा आणि विद्यार्थ्यांचा भावी वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील एम टी एस या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. पौळ,प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार दत्तात्रय मुजमुले,सेवानिवृत्त शिक्षक कविदास हांडीबाग,रामराव इंगळे, सुर्यकांत जाधव, जालिंदर इंगळे उपस्थित होते. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अनेक यशोशिखरे गाठता येतात. जिद्द आणि कष्ट याला मार्गदर्शनाची साथ मिळाल्यास प्रत्येक



विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो असे शाळेचे उपक्रमशील शिक्षक जयराम मांगडे बोलताना सांगितले. आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतून एम टी एस.या शासनाच्या मान्यता प्राप्त स्पर्धा परीक्षेसाठी १० विद्यार्थी परीक्षेस सामोरे गेले होते त्यातील आठ विद्यार्थ्यांनी गोल्ड आणि सिल्वर मेडल पटकावले आहे.आशिष सूर्यकांत जाधव, समर्थ अशोक हंडिबाग, अपेक्षा सिद्धाम हंडिबाग ज्योती रामराव इंगळे,शंभुराजे रजनीकांत हंडिबाग,आरोही अशोक हंडिबाग अविष्कार अशोक इंगळे,ईशाणी धैर्यशील इंगळे, रुद्र बळीराम शिकारे,नंदिणी व्यंकट इंगळे आदी विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल आणि सिल्वर मेडल पटकावले होते.त्यांचा मेडल,प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि जिल्हा परिषदेच्या शाळा इतर शाळेपेक्षा कमी नाहीत हे आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेने दाखवून दिले आहे.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत या शाळेतील उपक्रमशील शिक्षकांनी शाळेची वेगळी ओळख निर्माण करत जिल्हा परिषद शाळेचा दर्जा उंचावला असल्याचे मत पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांनी बोलताना व्यक्त केले.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

सा ै.के .एस.के .महाविद्यालयात क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार साजरी करण्यात आली. क्रांतसिंह नाना पाटील हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्वातंत्र्य सेनानी समाजकारण आणि राजकारणात त्यांनी सहभाग घेतल्यामुळे तलाठी पदावरून काढण्यात आले.१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला.स्वातंत्र्य लढयाबरोबरच बहुजन समाजाच्या विकासामध्ये तसेच अंधश्रध्दा निर्मुलन व अनिष्ठ प्रथा बद्दल त्यांनी जनजागृती केली. १९२० ते १९४२ मध्ये अनेक वेळा तुरूंगवास भोगावा लागला. १९४२ ते १९४६ या काळात भूमीगत राहून प्रतिसरकार स्थापन केले.बीड मतदार संघातून ते लोकसभेवर निवडूण गेले होते.मराठीतून संसदेत भाषण करणारे ते पहिले मराठी खासदार होते.अशा शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.दुष्यंता रामटेके यांनी केले तर आभार डॉ.सय्यद इमाद यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे पदव्युत्तर संचालक डॉ.खान अन्सारउल्ला शफी उल्ला, आदीसह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते



बीड शहरातील एकनाथ नगर, भक्ती कंन्स्ट्रक्शन येथील कै. संजय बारस्कर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणा निमित्त आज बारस्कर प्रतिष्ठानच्या वतीने अमोल बारस्कर यांनी रक्तदान शिबीर आयोजित केले होते, या शिबिरास शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, द्वारकाधीश प्रतिष्ठानचे परशुराम गुरखुदे, संदीप उबाळे, पंकज कुटे, कचूअण्णा जगताप, गणेश लोणकर, रंजीत चौरे सह मित्र परिवार उपस्थित होता.

## सहशिक्षिका मसरत सुलताना अन्सारी यांच्याकडून गरजूवंत विद्यार्थ्यांना ५०० वह्या वाटप

बीड । प्रतिनिधी शहरातील भालदार पुरा स्थित मिल्लीया उर्दू प्राथमिक शाळा (मुलींची) येथील सहशिक्षिका मसरत सुलताना अन्सारी यांनी स्वखर्चाने शाळेतील गरजूवंत १२५ विद्यार्थ्यांना ५०० वह्यांचे वाटप केले. आवश्यक असलेल्या वह्या आपल्या शिक्षिकेकडून मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठ्या प्रमाणात आनंद फुलल्याचे दिसून आले. उर्दू भाषेतील नामांकित अंजुमन ईशात-ए-तालीम या संस्थेचे भालदार पुरा येथील मिल्लिया प्राथमिक शाळेत मसरत सुलताना अन्सारी या दोन वर्षापूर्वीच सहशिक्षिका पदावर रुजू झाल्या आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान करीत असताना पाहिले की, अनेक विद्यार्थी असे आहेत ज्यांना शिक्षण घेताना आवश्यक असलेले वह्या, रजिस्टर नाहीत. त्यांनी ही बाब हेरून स्वखर्चाने ५०० वह्या व रजिस्टर शाळेत आणले आणि ते संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते १२५ विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी घेण्यात आलेल्या एका छोट खानी क र्यक्र माचे सूत्रसंचालन नजमुसहेर आणि सबीया खतीब या दोन्ही सहशिक्षिकांनी केले. वह्या, रजिस्टर वाटपाचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाजरा बाजी, फैसल सर, शाज़ीया बाजी, निशात बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी अपडेट, दोषमुक्तीसाठी वाल्मिक कराडची तडफड, घेतला मोठा निर्णय

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण चांगलेच गाजले होते. आमदार धनंजय मुंडेच्या जवळचा सहकारी असलेला वाल्मिक कराडचा या प्रकरणात हात असल्याचा आरोप आहे. सध्या वाल्मिक कराडला दुसऱ्या एका गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. अशातच आता संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. याबाबत सविस्तर माहिती समोर आली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातीर आरोपी वाल्मिक कराडने आपण दोषी नसल्याचा अर्ज बीड विशेष न्यायालयाकडे वकिलांच्या मार्फत केला होता. मात्र हा अर्ज कोर्टाने फेटाळला होता. त्यानंतर आता वाल्मिक कराडने वकिलांच्या मार्फत हायकोर्टात धाव घेतली आहे. दोष मुक्तीच्या अर्जासंदर्भात आणि दोषारोप पत्रासंदर्भात हायकोर्टात रीट पिटीशन दाखल केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणात दोषमुक्तीसाठी वाल्मिक कराडची तडफड सुरु असल्याची माहिती समोर आली आहे.

वाल्मिक कराडने बीडच्या कोर्टाकडे अर्ज केला होता तेव्हा कोर्टाने महत्वाची निरिक्षणे नोंदवली होती. न्यायालयाने वाल्मिक कराड यांना संतोष देशमुख खंडणी प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचे म्हटले होते. तसेच वाल्मिक कराड हा संघटित गुन्हेगारी टोळीचा सदस्य आहे, असं कोर्टानं निरीक्षण नोंदवलं होत.

वाल्मिक कराड यांनी अवदा कंपनीकडून खंडणी वसूल करण्यासाठी कट रचला. वाल्मिक कराड सह टोळीवर एकूण 20 गुन्हे तर सात गंभीर गुन्हे मागच्या 10 वर्षात दाखल झालेले आहेत. वाल्मिक कराडच्या विरोधात डिजिटल पुरावे सुद्धा आहेत. अनेक साक्षीदारांचे जबाब, तांत्रिक, डिजिटल वैज्ञानिक



पुराव्यांच्या आधारे कराडच कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचं नमूद करण्यात आलं आहे.

त्याचबरोबर 2 कोटींसाठी कराड आणि त्याच्या साथीदारांनी अवदा एनर्जीच्या अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या होत्या. खंडणी प्रकरणात संतोष देशमुख यांनी हस्तक्षेप केला म्हणूनच कराड आणि साथीदारांनी हा कट रचला आहे. तर हा खटला पुढे चालू ठेवण्यासाठी पुरेशी कारणं आहेत म्हणून याचिका फेटाळतो असंही कोर्टानं म्हटलं होतं. त्यानंतर आता वाल्मिक कराडने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com